Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# सावित्रीबाईंची साहित्य साधना

**डॉ. कल्पना मेहरे,** नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा रेल्वे, जि. अमरावती.

स्त्री-मुक्तीच्या आद्य प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांचे साहित्य म्हणजे एकोणविसाव्या शतकाचा इतिहास आहे. 19 व्या शतकातील स्त्री-रत्न असलेल्या सावित्रीबाईनी कृतिशील समाजसुधारक जोतिराव फुले यांच्या कार्यात स्वतःला झोकून देऊन त्यांच्या कार्यातूनच प्रेरणा घेऊन स्वतः साहित्य निर्मिती केली.

सावित्रीबाई हया एक स्वतंत्र प्रज्ञेच्या कवयित्री होत्या. सामाजिक अन्यायाची जाणीव काव्यातून व्यक्त करणारी त्या काळातील सावित्रीबाई ही पहिलीच कवयित्री होय. कारण वैयक्तिक सुखदुःखे, वात्सल्य, पतिप्रेम, मातृप्रेम ज्यात व्यक्त होते अशी स्त्री गीते त्या काळात खूप लिहिली गेली. परंतु समाज उन्नतीचे कार्य एक व्रत म्हणून स्विकारलेल्या सावित्रीबाईंनी एका प्रखर निष्ठेने नव्या क्रांतिकारी विचारधारेने आपले लेखन केले. त्यामुळे आधुनिक काळातील एक बंडखोर लेखिका म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. निसर्गातील पाखरांना, फुलांना मनसोक्त जगण्याचा जसा निसर्गदत्त अधिकार आहे तसे जगणे समाजात स्त्रीला लाभावे ही प्रामाणिक भावना त्यांच्या लेखनामागे होती. समग्र स्त्रीवर्गाची परंपरागत दास्यातून मुक्ती व्हावी, स्त्री जगण्याच्या संघर्षात कुठेतरी ठामपणे उभी रहावी ही मूलभूत अपेक्षा सावित्रीबाईंनी लेखनी हातात धरताना बाळगली होती. जोतिरावांची शिष्या अर्धांगिणी, आद्य शिक्षिका असलेल्या सावित्रीबाईंच्या लेखनावर मात्र प्रस्थापित साहित्यिकांकडून उपेक्षेचा पडदा पडला. यामागील कारण असेही असू शकते की, कदाचित जाग्या झालेल्या स्त्री मनाच्या स्वाभिमानी हुंकाराने पुरूषांच्या अंकित राहिलेली स्त्री बड करून उठेल व फुकटचे गुलाम म्हणून राबवायला मिळणारी स्त्री स्वातंत्र्याची मागणी करील. पुरूषच काय परंतु ज्यांच्यासाठी सावित्रीबाई हयातभर झगडल्या त्या स्त्रियांना सुध्दा सावित्रीबाईंची ओळख अजून पूरतेपणी झालेली नाही ही शोकांतिका आहे.

सवित्रीबाईंच्या साहित्य लेखनाचा केंद्रबिंदू सामान्यांना ज्ञानाची दारे उघडी करून त्यांचे जीवनमान सुधारणे हा होता. सामान्यांच्या जगण्याचे चित्रण साहित्यात आल्याशिवाय तळागळातील माणूस जागा होणार नाही याची सावित्रीबाईंना पूरेपूर जाणीव होती आणि तसा आंतरिक आत्मविश्वास होता. सावित्रीबाईंनी फक्त कवयित्री म्हणून आपले काव्य लेखन केलेले नाही. कारण त्यांच्यामागे सामाजिक कार्याचा प्रचंड व्याप होता. कारण त्या मुळात समाजक्रांतिकारक होत्या. आपले सामाजिक कार्य करता करता आपल्या समाजाबांधवांना काही सांगावे. त्यांच्या पर्यंत प्रबोधन न्यावे या आशेने त्यांनी कविता रचल्या. त्यांनी आपले कार्य लेखणी व कृतीतून लोकांपर्यंत पोहोचविले.

सावित्रीबाईंचे जीवन व कर्तृत्व हे, स्त्री ही स्वतंत्र बाण्याची व कर्तव्यदक्ष निर्माण व्हावी यासाठीच वाहिलेले होते. स्त्रीदास्यमुक्ती व स्त्रियांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व या दृष्टीने सावित्रीबाईंनी केलेले लिखाण हे स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या इतिहासात सुरूवातीचे लिखाण म्हणून सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे.

**सावित्रीबाईंच्या साहित्याचे प्रकार**

**पद्य वाङ्.मय -** 1) काव्यफुले 2) बावन्नकशी सुबोध रत्नाकर

**1) काव्यफुले**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

सावित्रीबाईंचा हा पहिलाच काव्यसंग्रह शिळा प्रेसवर 1854 मध्ये छापून प्रसिध्द करण्यात आला. यामध्ये तळागळात दबलेल्या मानवी भावभावनांचे चित्रण केले आहे. एकुण 41 रचनांचा या काव्यसंग्रहात अंतर्भाव आहे. विविध विषयांना स्पर्श केलेल्या हया काव्यसंग्रहात आत्मकथनपर, निसर्गचिंतनपर, बोधपर, समाज चिंतनपर, काव्यचिंतनपर असे वेगवेगळे प्रकार आहेत.

आत्मकथनपर प्रकरणात सावित्री - जोतिरावांच्या संवादाचे चित्रण आहे. सावित्रीनी जोतिरावांबाबत काढलेले उद् गार-

काळरात्र गेली! अज्ञान पळाले
सर्वा जागे केले! सूर्याने या

एकंदरीत सावित्रीबाईंच्या विचार सौंदर्याचे, भाषासौंदर्याचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते.

**2) बावन्नकशी सुबोध रत्नाकर**

जोतीरावांच्या मृत्यु नंतर 1892 मध्ये प्रसिध्द झालेला 52 कडव्यांच्या दिर्घ रचनेचा हा काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहात भारताच्या प्राचीन काळापासून ते जोतीरांवाच्या काळापर्यंतच्या समाजस्थितीचे वर्णन असून हालअपेष्टा भोगणाऱ्या शुद्रातिशूद्रांसाठी जोतिरावांनी आपले जीवन कसे समर्पित केले आहे त्याचे सुरेख चित्रण सावित्रीबाईंनी केले आहे. त्या लिहितात

स्त्रिया - शूद्र सारे गुलामी गुहेत
पशूसारखे राहती ते कूपात....

सावित्रीबाईंच्या काव्यात समाज परिवर्तनाचा जुन्या समाजरचनेला बदलण्याचा तीव्र आवेश दिसून येतो. त्यातील विचारांनी मन अस्वस्थ होते. उपमा- अलंकाराचा त्या सहज वापर करतात त्यांची भाषाशैली अर्थवाही आहे. नैसर्गिक उत्स्फूर्त अशी त्यांची लेखनशैली आहे.

**महात्मा जोतिराव फुले यांची भाषणे 25 डिसेंबर 1856**

जोतिरावांच्या भाषणाचे संकलन व संपादन अतिशय नेटकेपणाने केले आहे. भाषा प्रौढ, प्रगल्भ असून विचार प्रवर्तकता हा लेखनगुण प्रत्ययास येतो

**सावित्रीबाईंनी जोतिरावांना लिहिलेली तीन पत्रे**

समाजाच्या विकासाची, उत्कर्षाची स्वप्ने पाहणाऱ्या पती-पत्नीच्या मनाची स्पंदने म्हणजे सावित्री जोतिरावांचा हा पत्र व्यवहार होय. सावित्रीबाईंनी आपल्या माहेरातून नायगाव वरून जोतिरावांना तीन पत्रे लिहिली.

1. 10 ऑक्टोंबर 1856 - या पत्रात सावित्रीने जोतिरावांना लिहिले की, जोतिरावांनी शूद्रादी लोकांसाठी सुरू केलेल्या कार्यामुळे भाऊ रागावला. रागावलेल्या आपल्या भावाच्या विचारात आपण कसे परिवर्तन घडवून आणले याचा वृतांत्त दिलेला आहे.
2. 29 ऑगस्ट 1868 – या पत्रात ब्राम्हणाचा गणेश व महाराची सारजा यांचे प्रेमसंबंध त्यातून सारजाचे सहा महिन्याचे गरोदरपण. नायगावच्या मंडळींचा त्या दोघांना मारण्याचा बेत आपण कसा हाणून पाडला याचा वृतांत्त आला आहे.
3. तिसरे पत्र 1876 – यात जुन्नर भागातील तीव्र दुष्काळाने हैराण झालेल्या स्थितीचे वर्णन आहे.

**सावित्रीबाईची भाषणे**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

सावित्रीबाईंनी आपल्या भाषणातून जनसामान्यांमधील अंधःविश्वास, आळशीपणा, रूढी परंपरेवरील विश्वास, व्यसने, कर्ज यावर कडाडून टीका केली आहे. उद्योग, विद्यादान, सदाचरण, नवविज्ञानदृष्टी याबाबत उपदेश केला आहे.

**सावित्रीबाईंचे अध्यक्षीय भाषण**

1893 साली सत्यशोधक समाजाच्या 20व्या वाढदिवसानिमित्त सावित्रीबाईंनी तडफदार भाषण केले. या भाषणामध्ये त्यांनी पारतंत्र्याला जबाबदार वर्ग हा ज्ञानाचा मक्ता असलेला, स्वतःला श्रेष्ठ समजणारा, स्त्रियांना दोन हजार वर्षापासून सत्ता व संपत्ती यापासून दूर ठेवणारा असल्याचे सांगितले.

**इतर**

वेगवेगळया प्रसंगी त्यांनी काही अभंग, ओवी, रचनांची निर्मिती केली आहे. सामाजिक काव्य लिहिणारी कवयित्री, उत्तम लेखिका, वक्ती, स्त्री-पददलितांच्या शिक्षणाची पुरस्कर्ती सावित्रीबाई यांच्या समाजपरिवर्तनाच्या कांतिकारी मार्गाचा आलेख त्यांच्या साहित्य साधनेतून दिसून येतो. तसेच त्यांच्या लेखनातून त्यांच्या कर्तृत्वाचे ठसठशीत रूप प्रकट होते.

**निष्कर्ष**

1. सावित्रीबाईंचे साहित्य हे महिलांच्या सर्वांगीण उन्नतीचा जाहीरनामा मांडणारे आहे.
2. शूद्रातिशूद्रांच्या जागृतीचा ध्यास समोर ठेवून लेखन केलेले असल्यामुळे दुखितांच्या दुःखांना वाचा फोडणारे आहे.
3. लेखनाचा मूळ उद्देश समाजसुधारणा व समाजजागृती आहे.
4. सावित्रीबाई हया स्वतंत्र प्रज्ञेच्या कवयित्री असून त्याकाळात सामाजिक अन्यायाची जाणीव प्रथम त्यांनी आपल्या काव्यातून मांडली आहे.
5. सावित्रीबाईंचे साहित्य हे जननिष्ठ आहे.

**संदर्भ**

1. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय : संपा. डॉ. मा. गो. माळी, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
2. युग स्त्री सावित्रीबाई : राजाराम सूर्यवंशी, माळवाई प्रकाशन, शिरूर
3. महात्मा फुले : दुर्मिळ वाङ् मय आणि समकालीन चरित्रे : संपादक डॉ. मा. गो. माळी, डॉ. सुभाष सावरकर प्रकाशक मराठी जनसाहित्य परिषद, गणेश कॉलनी, अमरावती.
4. स्त्रीमुक्ती विशेषांक अक्षरवैदर्भी 2004.
5. लोकमाता सावित्रीबाईफुले व्यक्तित्व आणि कवित्व - प्रा. सतीश तराळ, बजाज प्रकाशन, अमरावती.


Copyright © | JET Network, All Rights Reserved